सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १२१ | बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com




अमळनेर : प्रांताधिकारी व दस्त नोंदणी कार्यालयासमोर लावण्यात आलेली जप्त केलेली वाहने. दुसऱ्या छायाचित्रात तहसील कार्यालयासमोर लावण्यात आलेली जप्तीची वाहने.

## प्रांत, तहसील, दस्त नोंदणी कार्यालयांचा श्वास गुदमरला

### सामाजिक कार्यकर्ते संदीप घोरपडे यांनी प्रशासनावर ओढले ताशेरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रांताधिकारी कार्यालय आवारात महसूल विभागाने अवैध वाळू वाहतुकीची जप्त करून आणलेली वाहने बेशिस्तीने लावण्यात आली आहेत. या वाहनांमध्येच चक्क कचरा टाकल्यानी ही वाहने कचरा डेपो झाली आहेत. परिणामी प्रांताधिकारी, तहसील व दस्त नोंदणी कार्यालयाचाच श्वास आता गुदमरतोय, अशी तक्रार संदीप घोरपडे यांनी केली आहे. प्रशासनाने आता तरी लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.



अमळनेर : तहसील आवारात लावण्यात जप्तीची वाहने.

याबाबत त्यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे, की प्रांताधिकारी कार्यालयाची इमारत ही इंग्रज काळातील अत्यंत सुरेख देखणी इमारत आहे. भव्य प्रवेशद्वार असून, प्रवेशद्वारावर स्वराज्य प्रेरिका राजमाता जिजाऊंचा अत्यंत रुबाबदार असे छायाचित्र लावण्यात आले आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचीही प्रतिमा पाहून छाती फुलून येते. मात्र, थोडे पुढे गेल्यानंतर पावसाळा असेल तर पाण्याच्या डबक्यातून मार्ग काढत जावे लागते. जुन्या प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर मात्र माणसे एकमेकाला धडकायला सुरुवात होते. त्याचे कारणही म्हणजे महसूल विभागाने कारवाई करून पकडून आणलेले ट्रॅक्टर, रिक्षा, ट्रॉली या साऱ्यांना डम्पिंग ग्राउंड सारखे सर्व दूर दाटीवाटीने उभे करण्यात आले आहे. त्यात प्रांताधिकारी व तहसीलदारांच्या गाड्या आपले अंग चोरून उभ्या असतात. त्यात तीन अत्यंत प्रमुख कार्यालय असल्याने तालुकाभरातून लोकांची ये- जा असते. त्यात विद्यार्थी महिला व वयोवृद्ध माणसे, अनेकदा मोर्चे, निवेदन देणाऱ्या कार्यकर्त्यांची आलेली अफाट गर्दी असते. मात्र, या कार्यालयात येणे म्हणजे श्वास रोखून पुढे जावे लागते. आतील स्वच्छतेला वाव नाही. आलेल्या अभ्यासतांना बसण्यासाठी व्यवस्थित जागा नाही. स्वच्छतागृह अथवा पिण्याच्या पाण्याची कोठेही सोय दिसून येत नाही. त्यामुळे ही एखाद्या अत्यंत निबिड अरण्यात असलेल्या छोट्याशा गावाची चावडी असावी असा भास होतो. म्हणून असे वाटते, की या कार्यालयातील कार्यालय प्रमुखांनी उगाचच रागा करण्यापेक्षा या वाहनांना आपल्या अखत्यारीत असलेल्या अनेक जागा आहेत तेथे यांची सोय करावी. त्यातून नागरिकांची होणारी गैरसोय टाळावी.



ग्लोबल महातेज

06 Jan 2026 - Page 1

अमळनेर महसूल आवारात वाळू जप्तीची वाहनेच झाली कचरा कुंड्या

दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव; महसूल प्रशासनाचे दूर्लक्ष

(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

अमळनेर : तहसील आवारात वाळू जप्तीच्या ट्रॅक्टरमध्ये साचलेला कचरा.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील महसूल विभागाने अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने जप्त करून तहसील आवारात लावली आहेत. मात्र, या वाहनांचा वापर सर्रास कचरा कुंडी म्हणून होऊ लागला आहे. तहसील आवाराची अस्वच्छतेमुळे दयनीय अवस्था झाली आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. दुर्गंधीने नागरिक त्रस्त झाले आहेत. याकडे महसूल प्रशासनाचे दूर्लक्ष आहे.

ट्रॅक्टर- ट्रॉली व इतर जप्तीच्या वाहनांमध्ये कचरा टाकला जात आहे. पालापाचोळा, प्लास्टिक पिशव्या, रिकाम्या बाटल्या, कागद, थर्माकोल व इतर टाकाऊ साहित्य दिसून आले. त्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तहसील कार्यालयात विविध कामांसाठी येणारे शेतकरी, नागरिक, महिला व वृद्धांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कचऱ्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून कर्मचाऱ्यांसह नागरिकांच्या आरोग्यास धोका आहे.

विशेष म्हणजे या वाहनांचा अशा पद्धतीने गैरवापर सुरू आहे. या निष्काळजीपणाबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे. परिसराची नियमित स्वच्छता राखावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

### दै. ग्लोबल महातेजने वेधले होते लक्ष

दै. ग्लोबल महातेजने दि. मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी 'अमळनेर महसूल आवारात वाळू जप्तीची वाहनेच झाली कचरा कुंड्या' या शिर्षकाखाली बातमी प्रकाशित करून या समस्येला वाचा फोडली होती. उदासिन असलेल्या प्रशासनाने त्याचवेळी कार्यवाही करणे अपेक्षित होते. तसे झाले असते, तर आता प्रशासनास नागरिकांच्या तक्रारींना तोंड देण्याची वेळ आली नसती. मात्र, कुंभकर्णी झोपेत असलेल्या प्रशासनास काहीही सोयरसूतक नसल्याचे दिसून येते. परिणामी नागरिकच आता रस्त्यावर उतरण्याची प्रशासन जणू वाट पाहात आहेत. आता तरी प्रशासनाने उपाययोजना करण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## उघडे ट्रान्सफॉर्मर अपघातास निमंत्रण

### न्यू प्लॉट परिसरातील स्थिती; वीज कंपनीचा भोंगळ कारभार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील न्यू प्लॉट परिसरातील बीएसएनएल कार्यालयाच्या संरक्षण भिंतीलगत उघडा ट्रान्सफॉर्मर अपघातास निमंत्रण ठरत आहे. वीज वितरण कंपनीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला असून, तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

या ट्रान्सफॉर्मारवरील पॅनल बॉक्स गेल्या अनेक दिवसांपासून धोकादायक अवस्थेत आहेत. न्यू प्लॉट परिसर अत्यंत वर्दळीचा परिसर आहे. लहान मुले, विद्यार्थी- विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिक, पादचारी मोठ्या संख्येने या परिसरात वावरतात. मात्र, त्यांच्या जीवितास धोका आहे. या ट्रान्सफॉर्मरला संरक्षक कव्हर बसविलेले नाही. शॉर्टसर्किट, विजेचा धक्का किंवा आग लागण्याचा मोठा धोका आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच महावितरण जागे होईल का असा प्रश्न उपस्थित केला आहे.



अमळनेर : न्यू प्लॉट भागातील उघडे पडलेले ट्रान्सफॉर्मर.

## क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे विविध मागण्यांसाठी बोंबाबोंब आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेतर्फे मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी येथील तहसील आवारात बोंबाबोंब आंदोलन केले. प्रांताधिकाऱ्यांना निवेदनही देण्यात आले.



अमळनेर : बोंबाबोंद आंदोलनात सहभागी क्रांतीकारी संघटनेचे ईश्वर पाटील, शरद पाटील, विश्वासराव पाटील आदी.

निवेदनात म्हटले आहे, की केंद्र शासनाने महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे नाव बदलून जीरामजी योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सिंचन विहीर २७३, गोठा शेड १४८, शोष खड्डा २७, घरकूल ३८१७ लाभार्थ्यांना कुशल व अकुशल कामासाठी मजुरीचे अनुदान वेळेत का पूर्ण मिळाले नाही. तो लाभ मिळाला पाहिजे.

पान ३ वर

## नियतीचे क्रूर घाव झेलूनही उभी आहे 'माऊली'

### जळगावच्या ८१ वर्षांच्या आजींच्या संघर्षाला तरुणांची साथ !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दुःख पचवून जे पुन्हा उभे राहतात, तेच खऱ्या अर्थाने जगतात या उक्तीचा प्रत्यय जळगावच्या गणेश कॉलनी परिसरात आल्यावर येतो. वयाच्या ८१ व्या वर्षी जिथे शरीराला आरामाची गरज असते, तिथे सुशीलाबाई शिंपी नावाची एक माऊली आपल्या पत्र्याच्या टपरीवर आजही संसाराचा गाडा हाकत आहे. नियतीने एकामागोमाग एक घरातील चार कर्ते पुरुष हिरावून नेले. मात्र, तरीही न डगमगता ही आजी आपल्या सुना आणि नातवंडांसाठी हिमालयीन जिद्दीने उभी आहे. त्यांच्या याच संघर्षाला आता समाजातील दानशूर हातांनी माणुसकीचा आधार दिला आहे.

**शब्दांपेक्षा कृतीचा आधार मोठा**

आजींच्या या संघर्षाची कहाणी जळगावमधील काही संवेदनशील तरुणांना समजली. केवळ हळहळ व्यक्त करून किंवा सहानुभूतीचे शब्द बोलून त्यांचे दुःख कमी होणार नाही, हे त्यांनी ओळखले. प्रताप पाटील, धनराज कासट, विनीत आहुजा आणि रोहित आहुजा या मित्रांनी प्रत्यक्ष मदतीचा निर्धार केला. त्यांनी थेट आजींची टपरी गाठली आणि तिथे चाललेली त्यांची धडपड पाहून



त्यांचे मन हेलावून गेले. 'आम्ही आहोत तुमच्या पाठीशी'या चौघांनी मिळून केवळ आर्थिक मदतच केली नाही, तर त्या कुटुंबाला मायेचा आधारही दिला. त्यांनी कुटुंबाला महिनाभर पुरेल इतका संपूर्ण किराणा माल आजींच्या स्वाधीन केला. आजींच्या सुनेच्या आणि नातवंडांच्या आजारपणाचा, औषधोपचाराचा आणि दवाखान्याचा संपूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्वीकारली. आजींना त्यांच्या या उतारवयात थोडा हातभार लागावा, यासाठी दरमहा ठराविक आर्थिक मदत (पेंशन स्वरूपात) देण्याचा शब्दही त्यांनी दिला आहे.या उपक्रमामुळे एका कष्टकरी माऊलीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले आहे. आजच्या काळात माणुसकी शिल्लक आहे, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. प्रताप पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी उचललेले हे पाऊल समाजासाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

### नियतीचा क्रूर खेळ अन् आजींची जिद्द

सुशीलाबाई शिंपी यांचे आयुष्य म्हणजे संकटांची मालिकाच. हसत्या- खेळत्या घरात नियतीने असा घाला घातला की, एकापाठोपाठ एक घरातील चारही कमावत्या पुरुषांचे निधन झाले. साधारण माणूस अशा आघाताने कोलमडून पडला असता. मात्र, सुशीलाबाई खचल्या नाहीत. आपल्या मागे असलेल्या सुना आणि लहान नातवंडांच्या भविष्याचा विचार करून त्यांनी डोळ्यातील अश्रू पुसले. पोटाची खळगी भरण्यासाठी पुन्हा कंबर कसली. गणेश कॉलनीतील एका छोट्या पत्र्याच्या टपरीवर त्या आजही ऊन-पावसाची तमा न बाळगता काम करतात.

### आजचे अभीष्टचिंतन





श्री. प्रमोद पिट्टी
व्यापारी



सौ. रश्मी निकुंभ
अमळनेर



श्री. हर्षल पाटील
अमळनेर

### दिनविशेष

२१ जानेवारी

- वयाच्या १६ व्या वर्षी थोरले माधवराव पेशवे यांनी पेशवेपद स्वीकारले.
- त्रिपुरा, मणिपूर आणि मेघालय स्वतंत्र राज्य बनले.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### श्री पंच देवता मारोती मंदिरात उद्या श्री गणेश महायाग

**अमळनेर** : येथील स्टेशन रोडवरील मुठे चाळ, मिल चाळ भागातील श्री पंच देवता मारूती मंदिरात गुरूवार दि. २२ जानेवारी रोजी गणेश जयंतीनिमित्त श्री गणेश याग आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ९ वाजता गणेश याग (हवन पूजा), सायंकाळी ७ वाजता महाआरती व ७: ३० वाजता तिर्थप्रसाद अशा कार्यक्रमांचे आयोजन उत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मुठे चाळ, मिल चाळ भागातील रहिवासी तसेच छत्रपती शिवाजी महाराज व्यायाम शाळा, श्री पंचदेवता महादेव मंदीर, परांजपे चाळ व सेवेकरी मित्र मंडळाचे सहकार्य लाभत आहे. भाविकांनी दर्शन व तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# टेम्पो चालवता-चालवता आकाशाला गवसणी!

## सक्सेस स्टोरी

## टेम्पोचालकाची उंच भरारी; उभारली विमान कंपनी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील नवीन विमान कंपनी शंख एअरबद्दल बरीच चर्चा सुरू आहे. पण त्याहूनही अधिक चर्चा कंपनीचा मालक श्रवण कुमार विश्वकर्माची होते आहे. टेम्पो चालवणारा हा माणूस आज विमान कंपनीचा मालक कसा काय बनला?

भारतातील एक नवीन विमान कंपनी शंख एअरबद्दल सध्या बरीच चर्चा सुरू आहे. पण त्याहूनही अधिक लक्ष या कंपनीचा संस्थापक आणि अध्यक्ष श्रवण कुमार विश्वकर्मा यांच्या आयुष्याकडे वेधले गेले आहे. आज एका विमान कंपनीचा मालक असलेला श्रवण टेम्पो चालवत होता. तो कसा काय एका एअरलाइन कंपनीचा मालक बनला? जाणून घेऊया.

श्रवणचा जन्म उत्तर प्रदेशच्या कानपूरमधील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. श्रवणला अभ्यासात रस नव्हता आणि त्याने लहान वयातच शाळा सोडली. आर्थिक अडचणींमुळे श्रवणने जवळजवळ एक वर्ष कानपूरच्या रस्त्यावर टेम्पो चालवला. माल चढविणे, उतरविणे, आणि खांद्यावर सामान वाहून नेणे. अशी कामे त्याने केली. पण त्याने कधीही हार मानली नाही. कठोर परिश्रम, समर्पण आणि हुशार निर्णयांनी त्याने अशक्य ते शक्य केले. ते कसे काय?

श्रवणची कहाणी २०१० च्या दशकात सुरू झाली. टेम्पो चालविल्यानंतर त्याने लहान व्यवसायात पाऊल ठेवले. आधी त्याने स्टील ट्रेडिंग (विशेषतः टीएमटी बार), नंतर सिमेंट, खाणकाम आणि वाहतूक क्षेत्रात पाय ठेवला. यापैकी बहुतेक व्यवसायात तो यशस्वी झाला. २०२२ मध्ये त्याने त्याची प्रमुख कंपनी शंख एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड सुरू केली. जी बांधकाम साहित्य, सिरॅमिक, काँक्रीट उत्पादने आणि घाऊक व्यापार करते. ही कंपनी आता कोट्यवधींची उलाढाल करते आणि श्रावणच्या व्यावसायिक साम्राज्याचा पाया रचते.

चार वर्षांपूर्वी २०२१-२२ मध्ये श्रवणला विमान वाहतूक क्षेत्रात प्रवेश करण्याची कल्पना सुचली. भारतात हवाई प्रवास गरज बनत आहे, पण मध्यमवर्गासाठी तो महागडा होता, इंडिगोसारख्या मोठ्या कंपन्यांवर जास्त अवलंबून राहिल्याने अनेकदा उड्डाणे रद्द करण्यासारख्या समस्या निर्माण होत होत्या. हे त्याच्या लक्षात आले. मग विमानांना बस किंवा टेम्पोसारखे वाहतुकीचे सामान्य साधन का बनवू नये? असा विचार त्याच्या मनात आला आणि त्याने शंख एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेड सुरू करत शंख एअरलाइन्सची पायाभरणी केली.

श्रवणचे वडील दररोज शंख वाजवत. त्यामुळे त्याने एअरलाइन कंपनीचे नाव शंख एअर हे ठेवले. कंपनीचे उद्दिष्ट उत्तर प्रदेशातील पहिली खासगी शेड्युल्ड एअरलाइन बनण्याचे आहे. डिसेंबर २०२५ मध्ये नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडून नाहरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळाल्यानंतर २०२६ च्या पहिल्या तिमाहीत (जानेवारी-मार्च) उड्डाणे सुरू होणार आहेत. सुरूवातीला तीन एअरबस ए ३२० विमाने भाड्याने घेतली जातील, जी लखनौला दिल्ली, मुंबई आणि इतर महानगरांशी जोडतील. उत्तर प्रदेशातील अंतर्गत शहरे जशी की गोरखपूर आणि वाराणसीदेखील जोडली जातील. कंपनीची योजना आहे की २-३ वर्षांत त्यांचा ताफा ०-२५ विमानांपर्यंत वाढवावा आणि २०२८-२९ पर्यंत आंतरराष्ट्रीय मार्ग सुरू करावेत.

श्रवणचा दृष्टिकोन स्पष्ट आहे, 'विमाने ही लक्झरी नाहीत, ती फक्त वाहतुकीचा एक प्रकार आहेत.' मध्यमवर्गीय आणि पहिल्यांदाच प्रवास करणाऱ्यांसाठी परवडणारे भाडे, विश्वासार्ह सेवा आणि प्रादेशिक कनेक्टिव्हिटीवर लक्ष केंद्रीत केले जाईल. तो जास्त किंमत टाळेल, म्हणजे सणांच्या काळातही तिकिटांच्या किमती गगनाला भिडणार नाहीत.

# याला म्हणतात संस्कार...

## देशमुखांच्या घरात लहान मुले जपतात 'ही' अनोखी परंपरा सूनबाई दीपशिखा यांनी शेअर केली पोस्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



रितेश देशमुख आणि जिनिलीया देशमुख यांची दोन्ही मुले रियान आणि राहील सोशल मीडियावर त्यांच्या कृतीमुळे कायमच चाहत्यांचे लक्ष वेधून घेतात. अनेकदा ते कॅमेऱ्यासमोर आले की हात जोडून उभे राहतात. यामुळे त्यांच्यावरील संस्कारांचे कायमच कौतुक केले जाते. पण रियान आणि राहील यांच्यासह देशमुख कुटुंबातील प्रत्येकावर उत्तम संस्कार आहेत.

देशमुख कुटुंबातील मुलांवर असलेले संस्कार अनेकदा सोशल मीडियावरील विविध पोस्टमधून पाहायला मिळाले आहेत. अशातच आता देशमुखांची सून दीपशिखा यांनी शेअर केलेल्या पोस्टमधूनही देशमुखांच्या घरचे संस्कार पाहायला मिळत आहेत. दीपशिखा या सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. सोशल मीडियावर त्या विविध पोस्ट शेअर करीत असतात. सासू वैशाली देशमुख यांनी बाभळगावात केलेल्या शेतीची खास झलकसुद्धा त्या आपल्या सोशल मीडियाद्वारे शेअर करीत असतात. अशातच त्यांनी मुलांचा एक फोटो शेअर केला आहे.

या फोटोमध्ये मुलांच्या हातात मेडल्स आणि समोर दिवंगत विलासराव देशमुखांचा फोटो पाहायला मिळत आहे. या पोस्टमधून दीपशिखा यांनी त्यांच्या मुलांनी कुठल्याही खेळात मेडल जिंकले, की ते थेट येतात आणि ते आजोबांना (विलासराव देशमुख) ते मेडल दाखवितात, असे म्हटले आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये दीपशिखा म्हणतात, की ही आमच्या घरची परंपराच आहे. प्रत्येक वेळेस जेव्हा माझी मुले एखादा मेडल्स जिंकून घरी येतात तेव्हा ते कुणीही सांगितल्याशिवाय त्यांचा प्रत्येक विजय आजोबांना समर्पित करतात. हे कधीच मी त्यांना शिकविले नाही. एक आई म्हणून लोक मला वारंवार विचारतात, की तुम्ही त्यांना हे शिकविले आहे का? यावर मी हसते, आणि त्या क्षणी मला समजते. हे असे निस्वार्थ प्रेम करणे शिकविता येत नाही. हे परंपरेने मिळालेले असते. हे त्यांच्यामध्ये जन्मजातच आहे.

दरम्यान, या पोस्टखाली अनेकांनी दीपशिखा यांच्या मुलांच्या या कृतीचे आणि संस्कारांचे कौतुक केले आहे. 'खूप छान... तुम्ही विलासरावांच्या सूनबाई शोभता', 'यालाच म्हणतात संस्कार', 'तुम्ही त्यांच्यावर अगदी योग्य संस्कार केले', या आणि अशा अनेक कमेंट्समधून चाहत्यांनी कौतुक केले आहे.

# अक्रोड का खावा? काय आहेत त्याचे फायदे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अक्रोड भिजवून खाण्याची पद्धत बदामपेक्षा थोडी वेगळी आहे. अक्रोड भिजवून खाण्याचा मुख्य उद्देश त्यातील पोषक तत्त्वे वाढविणे आणि पचन सुलभ करणे हा आहे.

### अक्रोड भिजवून खाण्याची पद्धत

- अक्रोडला ४-६ तास पाण्यात भिजवा.
- भिजवल्यानंतर अक्रोडला सोलण्याची गरज नाही.
- अक्रोडला थेट खाऊ शकता किंवा त्याचा वापर विविध रेसिपीमध्ये करू शकता.

अक्रोड सोलण्याची गरज नाही. कारण त्याचे बाह्य आवरण पातळ असते. तो सहजपणे पचतो.

### अक्रोड खाण्याचे अनेक फायदे आहेत.

**मेंदूचे आरोग्य :** अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते. जे मेंदूच्या विकासासाठी आणि कार्यासाठी महत्त्वाचे आहे.

**हृदयाचे आरोग्य :** अक्रोडमध्ये मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स असतात. जे हृदयाचे आरोग्य सुधारतात.

**कॅन्सर प्रतिबंध :** अक्रोडमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स असतात. जे कॅन्सरच्या पेशींचा विकास रोखतात.

**पचन सुधारते :** अक्रोडमध्ये फायबर असते. जे पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता टाळते.

**त्वचेचे आरोग्य :** अक्रोडमध्ये व्हिटॅमिन ई असते. जे त्वचेचे आरोग्य सुधारते आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करते.

**वजन नियंत्रण :** अक्रोडमध्ये फायबर आणि प्रोटीन असते. जे वजन नियंत्रणात मदत करते.

अक्रोड खाण्याचे हे आणि इतर अनेक फायदे आहेत. मात्र लक्षात ठेवा, की अक्रोडचे सेवन मर्यादित असावे. कारण त्यामध्ये कॅलरीज जास्त असतात.



# पैन अमेरिकन हायवे : दुनिया की सबसे लंबी सड़क बनने की रोमांचक कहानी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दुनिया की सबसे मशहूर और लंबी सड़क पैन अमेरिकन हायवे, एक ऐतिहासिक और इंजीनियरिंग का बेमिसाल उदाहरण है। १९२३ से शुरू हुए सपने को १९३६ में साकार करने की दिशा में पहला कदम उठा। इसके लिए मैक्सिको से पनामा तक पहला हिस्सा तैयार हुआ और फिर अलग-अलग देशों ने अपने हिस्से जोड़कर इसे महाद्वीप जोड़ने वाला मार्ग बना दिया। अलास्का से लेकर अर्जेंटीना तक लगभग ३० हजार किलोमीटर लंबी यह सड़क घने जंगल, बर्फीले पहाड़, वीरान रेगिस्तान और ग्लेशियरों से गुजरती है। हालांकि अब भी पनामा-कोलंबिया के दरम्यान 'दारियन गैप' नामक खंड अधूरा है, जिससे इस हिस्से में सड़क यात्रा संभव नहीं है। पैन अमेरिकन हायवे १४ देशों को जोड़ती है, और व्यापार, पर्यटन तथा लोगों के जीवन को जोड़ने का अद्भुत जरिया है। यही वजह है कि इसे दुनिया की सबसे लंबी और ऐतिहासिक सड़क माना जाता है। पैन अमेरिकन हायवे दुनिया की सबसे लंबी सड़क है, जो उत्तर और दक्षिण अमेरिका के 14 देशों को जोड़ती है और इसकी लंबाई लगभग ३० हजार किलोमीटर है।

### कैसे बनी सबसे लंबी सड़क?

- पैन अमेरिकन हायवे को बनाने का विचार सबसे पहले १९२३ में आया था, जब अमेरिकी राज्यों के सम्मेलन में इसे अमेरिका के एक छोर से दूसरे छोर तक जोड़ने का सपना देखा गया था।
- १९२५ में पहला अंतरराष्ट्रीय सम्मेलन अर्जेंटीना, बोलीविया, चिली, कोलंबिया, कनाडा, मैक्सिको और यूएसएसहित अन्य देशों के साथ हुआ, जिसमें सभी ने एक रोड नेटवर्क पर सहमति जताई।
- इसका निर्माण कार्य १९३६ में मैक्सिको और पनामा के बीच शुरू हुआ, और १९५० के दशक में विभिन्न देशों ने अपने-अपने हिस्से जोड़कर इस सड़क को आकार दिया।
- मुख्य चुनौती पनामा और कोलंबिया के बीच का १६० किमी लंबा 'दारियन गैप' है, जहां घने जंगल और दलदल के कारण अब भी सड़क नहीं बन पाई है।

### पैन अमेरिकन हायवे की खासियतें

- यह सड़क अलास्का (अमेरिका) के डेल्टाना जंक्शन से शुरू होती है और दक्षिण अमेरिका के अर्जेंटीना तक जाती है ।
- हायवे रेगिस्तान, पहाड़, जंगल और ग्लेशियर जैसे कठिन भौगोलिक क्षेत्रों से होकर गुजरती है।
- हर साल हजारों यात्री इस रोमांचक सफर का आनंद लेते हैं, लेकिन ड्राइविंग के लिए एक्सपर्ट होना जरूरी है।
- इसका नाम गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्ड में भी दर्ज है।

# घरच्या घरी उगवा 'हिरवे सोने'

## चार हजार रुपये किलोची हिरवी वेलची लावा कुंडीत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्याला बागकामाची आवड असेल आणि घरच्या घरी मसाल्यांची लागवड करण्याची इच्छा असेल, तर कुंडीत हिरवी वेलची लावण्याचा नक्की विचार करा. काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्यास हा महागडा मसाला आपल्या बागेत किंवा बाल्कनीत सहजपणे वाढवू शकता. आजच्या घडीला स्वयंपाकघरातील काही मसाले केवळ चव वाढविणारे नाहीत, तर महागडे आणि मौल्यवान मानले जातात. त्यापैकी एक म्हणजे हिरवी वेलची. बाजारात चांगल्या प्रतीची हिरवी वेलची दर किलो तीन हजार ते चार हजार रुपये दराने विकली जाते. अनेकदा ती बनावट किंवा कमी दर्जाचीही मिळते. मात्र आपणास माहीत आहे का हिरवी वेलची घरच्या घरी, कुंडीत किंवा अंगणात सहज उगवता येते? योग्य काळजी घेतली, तर ही वनस्पती वर्षानुवर्षे उत्पादन देते. आज आपण जाणून घेऊया घरच्या घरी हिरवी वेलची कशी उगवावी, कोणती माती योग्य असते, किती पाणी द्यावे, सूर्यप्रकाश कसा असावा आणि कोणत्या चुका टाळाव्यात?

- हिरवी वेलची लागवडीसाठी योग्य जागा
- हिरवी वेलची थेट कडक उन्हात वाढत नाही. तिला अर्धसावलीची जागा अधिक मानवते.
- सकाळचा सौम्य सूर्यप्रकाश चालतो
- दुपारचे कडक ऊन टाळावे
- बाल्कनीत ठेवताना जाळी किंवा सावली देणारे कापड वापरावे
- कुंडीत लावत असाल तर वारा खेळता राहील अशी जागा निवडावी



- कुंडी आणि माती कशी असावी?वेलचीची मुळे खोलवर जात असल्याने मोठी आणि खोल कुंडी आवश्यक असते.
- योग्य कुंडीकिमान १२१५ इंच खोलतळाला पाणी निचऱ्यासाठी छिद्रे असलेली

### योग्य माती मिश्रण

४० टक्के बागेची माती
३० टक्के कुजलेले शेणखत किंवा वर्मी कंपोस्ट
२० टक्के नदीची वाळू
१० टक्के कोकोपीट

### वेलची लावण्याची योग्य पद्धत

- हिरवी वेलची बियांपासून किंवा रोपांपासून लावता येते. मात्र घरगुती बागकामासाठी रोप लावणे अधिक सोपे आणि यशस्वी ठरते.
- नर्सरीतून निरोगी, हिरवे रोप घ्या
- कुंडीत आधी माती भरा
- मध्यभागी खड्डा करून रोप लावा
- माती हलक्या हाताने दाबा
- लगेच पाणी द्या

### पाणी किती आणि कधी द्यावे?

- वेलचीला ओलसर माती आवडते, पण पाणी साचणे घातक ठरू शकते.
- उन्हाळ्यात दररोज थोडे पाणी
- हिवाळ्यात २३ दिवसांनी
- पावसाळ्यात माती ओलसर असेल तर पाणी देऊ नये.

### खत आणि पोषण कसे द्यावे?

- चांगले उत्पादन मिळवण्यासाठी वेलचीला नियमित पोषण आवश्यक असते.
- दर २०२५ दिवसांनी वर्मी कंपोस्ट
- महिन्यातून एकदा गोमूत्र पाणी किंवा कंपोस्ट टी
- रासायनिक खत टाळावे
- यामुळे पाने हिरवी राहतात आणि काड्या मजबूत होतात.

### काढणी कशी करावी?


- वेलची पूर्ण वाढल्यावर हिरवीच काढावी
- पिवळी किंवा सुकलेली वाट पाहू नये
- सावलीत वाळवून साठवणूक करावी

### घरगुती वेलचीचे फायदे

- १०० टक्के केमिकल फ्री
- बाजारातील खर्चात बचत
- वर्षानुवर्षे उत्पादन
- घरच्या स्वयंपाकासाठी ताजी वेलची
- बागकामाचा आनंद आणि मानसिक शांतता

# हॉटेलमधील फ्री 'वाय-फाय' किती सुरक्षित?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आपण कोणत्याही हॉटेलमध्ये गेलो की सर्वांत आधी तेथील फ्री 'वाय-फाय' शोधतो. पण हे धोक्याचे ठरू शकते. हॉटेलमधील फ्री 'वाय-फाय' वापरल्याने आपले पैसे देखील बँक खात्यातून जाऊ शकतात. हॉटेलच्या 'वाय-फाय'शी हजारो लोक जोडलेले आहेत आणि अशा परिस्थितीत हॅकिंगला बळी पडणे ही काही मोठी गोष्ट नाही. हॉटेलच्या 'वाय-फाय' नेटवर्कमध्ये कालबाह्य सुरक्षा फीचर्स असल्याने हॅकर्सना संधी मिळते, हॉटेल किंवा सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असलेल्या मोफत 'वाय-फाय'मुळे आपले बँक खाते रिकामे होऊ शकते. हे आपल्या डेटामध्ये देखील प्रवेश करू शकते. जाणून घेऊया त्याचे धोके.

हॉटेलमध्ये मोफत 'वाय-फाय' मिळणे खूप सोयीचे आहे. परंतु ते धोकादायक असू शकते का? हॉटेलमध्ये चेक इन करताना पहिली गोष्ट करणे ती म्हणजे फोन त्याच्या 'वाय-फाय'शी कनेक्ट करणे. तथापि, मनात असा प्रश्न येतो, की असे करणे योग्य आहे की नाही. याचे उत्तर शोधण्यासाठी बरेच संशोधनही आजवर झाले आहे. संशोधनात असे दिसून आले आहे, की हॉटेलमधील 'वाय-फाय'मुळे डेटा ब्रीच आणि सायबर स्टॉकिंगसारख्या समस्या उद्भवू शकतात. जर आपण एखाद्या हॉटेलमध्ये चेक-इन केले तर आपल्याला हॉटेलच्या 'वाय-फाय'सह सुरक्षित कसे राहायचे हे माहीत असले पाहिजे.

### हॉटेल वाय-फाय सुरक्षित आहे का?

एका रिपोर्टनुसार फोन किंवा लॅपटॉप हॉटेलच्या 'वाय-फाय'शी कनेक्ट केल्याने डेटा, वैयक्तिक माहिती आणि बँक खात्यात जमा झालेले पैसे धोक्यात येतात. हॉटेलच्या 'वाय-फाय'शी हजारो लोक जोडलेले आहेत आणि अशा परिस्थितीत हॅकिंगला बळी पडणे ही काही मोठी गोष्ट नाही. हॉटेलच्या वाय-फाय नेटवर्कमध्ये कालबाह्य सुरक्षा फीचर्स असल्याने हॅकर्सना त्यात प्रवेश करणे खूप सोपे होते.

एकदा गुन्हेगारांना हॉटेलच्या वाय-फाय राउटरमध्ये प्रवेश मिळाल्यानंतर ते नेटवर्कवरील कोणत्याही डिव्हाइसच्या डेटामध्ये प्रवेश करू शकतात. ते आपल्या ऑनलाईन क्रियांवर लक्ष ठेवू शकतात, आपले संकेतशब्द आणि वैयक्तिक माहिती चोरू शकतात. आपले डिव्हाइस देखील हाताळू शकते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे विविध मागण्यांसाठी बोंबाबोंब आंदोलन

पान १ वरून

संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी या योजनच्या लाभार्थ्यांना डीबीटीच्या नावाखाली हजारो लाभार्थ्यांना त्यांच्या लाभापासून वंचित ठेवले आहे. त्यांना योजनेचा तत्काळ लाभ मिळावा. सर्व लाभार्थी हे शेतमजूर वर्ग असून, त्यांना लाभापासून वंयित ठेवल्यामुळे त्यांना उदरनिर्वाह भागविण्यासाठी अडचणी येत आहेत.

निवेदनावर क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष ईश्वर पाटील, जिल्हाध्यक्ष शरद पाटील, विश्वासराव पाटील, अरूण गव्हाणे, पंकज निकम, प्रवीण बोरसे, अशोक मोरे, नरेश चव्हाण, जयेश कोळी, गोकूळ बोरसे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# खानदेशवासियांचा दुबईत डंका

## ‘खानदेश महोत्सव यूएई २०२६’ जल्लोषात साजरा

### मातृभूमीतील संस्कृती, परंपरा अन् सामाजिक एकोप्याचे दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : परदेशात वास्तव्यास असतानाही आपल्या मातृभूमीची संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकोप्याची नाळ घट्ट ठेवणारा ‘खान्देशी इन यूएई’ या सामाजिक-सांस्कृतिक समूहाचा ‘खान्देश महोत्सव यूएई२०२६’ नुकताच अजमान (दुबई) येथे जल्लोषात पार पडला.

‘खान्देशी इन यूएई’चा लोगो अमळनेर येथील आशिष चौधरी यांच्या संकल्पनेतून स्वतः डिझाइन करून साकारण्यात आला आहे. खान्देशची ओळख, संस्कृती आणि परदेशातील अस्तित्व यांचा सुंदर संगम या लोगोमधून प्रतीत होतो, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या महोत्सवाला युएईमधील सातही इमिरात्समधून खादेशी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सुमारे २०० पेक्षा अधिक खानदेशी महिला- पुरूषांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. व्यस्त जीवनातून वेळ काढून समाजासाठी एकत्र येण्याची ही भावना विशेष उल्लेखनीय ठरली. कार्यक्रमात खानदेशी संस्कृतीचे विविध पैलू अनुभवायला मिळाले. मुलांसाठी खास आयोजित करण्यात आलेली ‘तीन पावली’ खानदेशी नृत्य कार्यशाळा हे महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले. तसेच प्रौढ व मुलांसाठी घेण्यात आलेल्या विविध गट- खेळांमुळे कार्यक्रमात उत्साह, आनंद आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सभासदांनी आपल्या कुटुंबीयांसह ओळख करून देत मुक्त संवाद साधला. यामुळे परदेशात असूनही समाजातील एकोप्याची भावना अधिक दृढ झाली व भावनिक नातेसंबंध अधिक घट्ट झाले. या महोत्सवाला दुबईतील प्रसिद्ध उद्योगपती धीरज जैन यांची आपल्या आई-वडिलांसह विशेष उपस्थिती लावली.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, दुबईतील जगप्रसिद्ध ‘बुर्ज खलिफा’ इमारतीत केवळ तीन भारतीय व्यक्तींची कार्यालये असून,



दुबई : खानदेश महोत्सव यूएई २०२६ महोत्सवात सहभागी खानदेशवासीय.

त्यापैकी एक कार्यालय आपल्या खानदेशी भूमीपुत्र धीरज जैन यांचे आहे. ही बाब संपूर्ण खानदेशसाठी अभिमानास्पद आहे. त्यांच्या सामाजिक व व्यावसायिक योगदानाची दखल घेत, त्यांचा “खानदेश आयकॉन” म्हणून सत्कार करण्यात आला. श्री. जैन यांनी युएईमधील खानदेशी उद्योजकांनी परस्पर सहकार्याने पुढे यावे, नवोदित व्यावसायिकांना मार्गदर्शन करावे व समाजाच्या प्रगतीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

महोत्सवात उपस्थितांनी अस्सल खानदेशी मेजवानीचा आस्वाद घेतला. शेव- भाजी, भाकरी, वांग्याचे भरीत, कढी-खिचडी यांसारख्या पारंपरिक पदार्थांनी कार्यक्रमाची रंगत वाढविली. समारोपप्रसंगी अहिराणी गाण्यांच्या तालावर सर्वांनी एकत्र ठेका धरत आनंद व्यक्त केला. भूषण चौधरी, घनश्याम पाटील, महेश जायखेडकर, राहुल पाटील, गणेश बोरसे, चंद्रशेखर जाधव व पिनल चौधरी यांनी पुढाकार घेतला. कमलेश जगताप, सारिका जायखेडकर, स्मिता पाटील, अजय पाटील, अनिल वायकर, संजय पाटील, धीरज पाटील, प्रियांका सोनकुल, स्वाती भोळे, सौ. रोही पवार, सचिन अमृतकर, प्रसाद पाटील, मानवेंद्र चौधरी, सौ. वर्षा बोरसे, सौ. प्रिया पाटील, सौ. मनीषा चौधरी, सौ. सुप्रिया पाटील, संदीप चौधरी, सागर गोहिल, गणेश पाटील, नीलेश ब्राह्मणकर आदींनी सहकार्य केले.

# थंडीत तुळशीचे रोप सुकलेय ? हळदीचा ‘हा’ उपाय करून पहा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



ऋतू बदलल्यामुळे जास्त थंडी किंवा तीव्र उष्णतेमुळे अनेकदा तुळशीचे रोप सुकू लागते. त्यामुळे लोक काळजीत पडतात आणि रोप वाचविण्यासाठी अनेक उपाय करतात. मात्र, ते नेहमी यशस्वी होत नाहीत. हीच समस्या लक्षात घेऊन आयुर्वेदाचार्यांनी तुळशीचे रोप पुन्हा हिरवेगार आणि निरोगी करण्यासाठी काही सोपे घरगुती उपाय सांगितले आहेत. हे घरगुती उपाय केल्यास तुळशीचे रोप पुन्हा निरोगी आणि हिरवेगार करता येते.

तुळशीचे रोप केवळ हिंदू धर्मात पूजनीय मानले जाते असे नाही, तर आयुर्वेदात तिला अमृतासारखे महत्त्व दिले आहे. घरात तुळशीचे रोप हिरवेगार राहणे म्हणजे सकारात्मक ऊर्जा, स्वच्छ वातावरण आणि चांगले आरोग्य यांचे प्रतीक मानले जाते. त्यामुळेच बहुतेक हिंदू कुटुंबे आपल्या घराच्या अंगणात किंवा बागेत तुळशीचे रोप लावतात. रोज पूजा करतात. तुळशीजवळ दिवा लावण्याचीही परंपरा आहे. त्यामुळे लोक तिच्या जपणुकीकडे खास लक्ष देतात.

आयुर्वेदाचार्य दिव्यांशू कुमार यांनी सांगितले, की आयुर्वेदात तुळशीला अमृतासारखे मानले जाते. तुळस अनेक आजारांमध्ये फायदेशीर ठरते. विशेषतः थंडीच्या काळात तुळशीच्या पानांचा काढा प्यायल्यास सर्दी-खोकला यांसारख्या त्रासातून आराम मिळतो. त्यांनी असेही सांगितले, की तुळशीचे रोप पर्यावरणासाठी उपयुक्त आहे आणि ते सतत ऑक्सिजन देते.

आयुर्वेदाचार्यांच्या मते, जास्त थंडी किंवा जास्त उष्णतेमुळे तुळशीचे रोप सुकू लागते. मात्र, घरगुती उपायांनी ते वाचविता येते. यासाठी स्वयंपाकघरात सहज मिळणाऱ्या दोन गोष्टी वापरता येतात. एक लिटर पाण्यात एक मोठा चमचा दही आणि एक छोटा चमचा हळद पावडर मिसळा.

हा तयार केलेला द्राव तुळशीच्या रोपाच्या मुळाजवळ इतक्या प्रमाणात ओता की माती थोडी ओलसर होईल. गरजेनुसार आठवड्यातून एक किंवा दोन वेळा हा उपाय करा. काहीच दिवसातच तुळशीचे रोप पुन्हा हिरवेगार आणि निरोगी दिसू लागेल. विशेषतः हिवाळ्याच्या काळात या घरगुती उपायाने तुळशीचे रोप सुरक्षित ठेवता येते. तुळशीसारखे औषधी आणि धार्मिक महत्त्व असलेले रोप प्रत्येक घरात लावावे आणि त्याची नियमित देखभाल करावी.



अमळनेर : स्वच्द आणि शुद्ध अन्न आपल्या बागेतून या स्पर्धेच्या पाहणीप्रसंगी रोटरी क्लबचे सचिव आशिष चौधरी व मान्यवर.

# “ स्वच्छ आणि शुद्ध अन्न आपल्या बागेतून ” स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महिला हाऊसिंग ट्रस्ट, पालिका, रोटरी क्लबचा अभिनव उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील महिला हाऊसिंग ट्रस्ट, पालिका व रोटरी क्लबतर्फे सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी शिवाजी बागेत “ स्वच्छ आणि शुद्ध अन्न आपल्या बागेतून ” स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिला सक्षमीकरण, अन्नसुरक्षा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांना चालना देण्यासाठी हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. सुमारे ५०० महिलांनी यात सहभाग नोंदविला.

ही स्पर्धा किचन गार्डन करणाऱ्या महिलांसाठी आयोजित करण्यात आली होती. घरच्या बागेत पिकविलेल्या भाज्यांपासून गॅस न वापरता पौष्टिक, चविष्ट व पर्यावरणपूरक पदार्थ तयार करण्याला प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. पाककलेचा आविष्कार स्पर्धेत महिलांनी त्यांच्या घरच्या बागेत पिकवलेल्या टोमॅटो, मिरची, दोडका, वांगी, कांदा, चवळी, गवार फळी, मेथी, धणे, पालक, बीट, गाजर, मुळा आदी भाज्यांचा वापर करून गॅस न वापरता विविध पदार्थ सादर केले. महिला रिसोर्स सेंटरतर्फे बंगाली फाईल, मिळ चाळ, स्टेशन रोड, गलवाडे रोड, गांधीपुरा, ताडेपुरा, कुंभारटेक या भागातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमात एकूण ५०० महिलांनी सहभाग घेतला. त्यापैकी २५० महिलांकडे किचन गार्डन असून, त्यातील ४४ महिलांनी प्रत्यक्ष स्पर्धेत सहभाग घेतला.

### विजेत्यांची नावे

स्पर्धेतील पदार्थांचे परीक्षण चव, पौष्टिकता, सादरीकरण व पर्यावरणपूरक पद्धत या निकषांवर करण्यात आले. गुणांकनानुसार पहिल्या सहा महिलांची निवड करून त्यांना पारितोषिके देण्यात आले. प्रथम क्रमांक- शशिकला कड, द्वितीय क्रमांक- मनीषा पाटील, तृतीय क्रमांक- सुन्नबी रशीद, चतुर्थ क्रमांक- पूजा हगवणे, पाचवा क्रमांक- चारू कड, सहावा क्रमांक- उषा गजरे मुख्याधिकारी गणेश शिंदे , किरण कंडारे, रोटरी क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी, सचिव आशिष चौधरी, सहाय्यक कृषी अधिकारी योग्यता लांडगे, दीपाली सोनवणे व परविन पिंजारी यांनी परीक्षण केले.



अमळनेर : कार्यशाळेत बोलताना प्रमुख वक्ते. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर. समोर उपस्थित विद्यार्थिनी.

### प्रताप महाविद्यालयात

# ‘शोधूया स्वत:ला, समजूया स्वत:ला’ विषयावर कार्यशाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील इलेक्ट्रोनिक्स व पदार्थविज्ञान विभागात रूसा अंतर्गत ‘शोधूया स्वत:ला, समजूया स्वत:ला’ या विषयावर गुरुवार, दि. १५ जानेवारी रोजी कार्यशाळा झाला. गुणविशेषांची ओळख व्हावी व त्यांनी स्वतः मधील उर्जेला योग्य ती दिशा कशी द्यावी या उद्देशाने ही कार्यशाळा घेण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रमुख व आयक्युएसी सम्नवयक डॉ. मुकेश भोळे अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. उल्हास सोनवणे, प्रा. खेमचंद पाटील यांनी विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांद्वारे जीवनाला दिशा देण्यासाठी लाईफ बॅलन्स शिटच्या माध्यमातून सखोल मार्गदर्शन केले. पदार्थविज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. अमित पाटील, डॉ. एस. डी. बागुल, प्रा. वृषाली वाकडे, प्रा. दीपाली सातपुते, प्रा. कल्याणी पाटील, प्रा. अमोल अहिरे, भगवान पाटील, पंकज भदाणे, मंगला पाडवी यांनी सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. एच डी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. माधुरी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रीती पवार यांनी आभार मानले.

# घोडा कधीच का बसत नाही, उभा राहूनच का झोपतो ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



प्राणी जगतातील रूबाबदार व ताकदवान प्राणी म्हणजे घोडा. कोणत्याही इंजिनाची ताकद ही हॉर्सपॉवरचे परिणाम वापरले जाते. घोडा एक मोठा व सशक्त प्राणी आहे. हालचालीसाठी व ताकदीसाठीच घोड्याच्या शरिराची बनावटच तयार झालेली असते. महत्वाचे म्हणजे घोड्याच्या पायामध्ये इलॅस्टिक टेन्डस असतात ते एखाद्या स्प्रिंगसारखे काम करतात. यातून उर्जा साठवणे व रिलिज केली जाते. पळण्यासाठी हे खूप महत्वाचे ठरते. दुसरे म्हणजे त्याच्या पायात स्टे अपरेटरस असतात. ही म्हणजे घोड्याच्या पायातील यांत्रिक स्नायू प्रणाली असते. यामुळे कितीही वेळ उभे राहिले तर त्याला थकवा येत नाही. घोडे बसू शकतात पण कधी बसत नाहीत ही स्टे अपरेटस स्नायू घोड्याला उभ्या स्थितीत झोप घेण्यास मदत करते. तसेच दुसरा फायदा म्हणजे स्नायूंवरचा ताण कमी करून ऊर्जा वाचवते. दीर्घकाळ उभा राहण्याची क्षमता देते. घोड्याची हृदयही अधिक मोठे असतात, तर प्फुप्फुसही मोठ्या आकाराची असतात. त्यामुळे तो अधिक वेळपर्यंत धावू शकतो. काही वेळा अतिश्रमाने घोडा दमला असेल तर तो सरळ जमिनीवर आडवा होऊन काही वेळ विश्रांती घेतो पण कधीच बसत नाही. तो आपल्या वजनाच्या २ ते ३ पट अधिकचे वजन घोडा सहज वाहून नेऊ शकतो. यामुळे जेम्स वॅटने अभ्यास केला, की एक घोडा ७४६ वॅटचे काम करतो. म्हणजेच १ हॉर्सपॉवर म्हणजे ७४६ वॅट असे परिणाम झाले.

# बाजार समितीची नोकरीभरती प्रक्रियेस स्थगिती द्यावी : पणन संचालकांचे आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बाजार समितीत सुरू असलेल्या नोकरभरती प्रक्रियेस स्थगिती द्यावी, असे आदेश पणन संचालक संजय कदम यांनी सभापती व सचिवांना दिले आहेत. याबाबत सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी बाजार समितीस पत्र पाठविले आहे.

पत्रात म्हटले आहे, की शासनाकडून धोरण निश्चित होईपर्यंत राज्यातील सर्व बाजार समितीमधील परंपरागत नियुक्त्यांना मान्यता व नवीन भरतीस परवानगी देऊ नये, असे शासनाने निर्देश दिलेले आहेत. तरी नोकरभरती प्रक्रिया राबविण्याबाबत दिलेल्या परवानगीस पुढील आदेश येईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे. पत्रावर पणन संचालनालयाचे (पुणे) संचालक श्री. कदम यांची स्वाक्षरी आहे.

# नाशिक, जळगावहून थेट दार्जिलिंग, महाबोधी मंदिराचा प्रवास झाला सोपा

## उत्तर महाराष्ट्राला जोडणारी अमृत भारत एक्स्प्रेस सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर महाराष्ट्राला जोडणारी नवीन अलिपूरद्वार-मुंबई (पनवेल) अमृत भारत एक्स्प्रेस सुरू झाली आहे. पूर्व भारत आणि पश्चिम किनारपट्टी यांच्यात ती महत्वाचा दुवा ठरेल. हा मार्ग अनेक प्रसिद्ध पर्यटनस्थळांना जोडणारा आहे. त्याचा महाराष्ट्रातील नाशिक, जळगावसह ठाणे आणि रायगड जिल्ह्याला फायदा होणार आहे.

भारत-भूतान आंतरराष्ट्रीय सीमेजवळ असलेल्या अलिपूरद्वार येथून सुरू होणारी ही सेवा अनेक कारणांनी महत्वाची ठरेल. एका संवेदनशील सीमावर्ती भागातील वाहतूक सुलभ करून आणि अनेक राज्यांमध्ये पूर्व-पश्चिम राष्ट्रीय कनेक्टिव्हिटी मजबूत करणार असल्याचे रेल्वे मंत्रालयाने जाहीर केले आहे. ही अमृत भारत एक्सप्रेस साप्ताहिक सेवा म्हणून धावेल. अलिपूरद्वार-मुंबई (पनवेल) अमृत भारत एक्सप्रेस अलिपूरद्वार येथून गुरुवारी सकाळी ४: ४५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे शनिवारी सायंकाळी ५: ३० वाजता पोहोचेल. पनवेल-अलिपूरद्वार अमृत भारत एक्सप्रेस पनवेल येथून सोमवारी सकाळी ११ : ५० वाजता सुटेल आणि बुधवारी दुपारी १: ५० वाजता अलिपूरद्वार येथे पोहोचेल. महाराष्ट्रात ती कल्याण, नाशिकरोड, जळगाव व भुसावळ या ठिकाणी थांबणार आहे.

हा मार्ग अनेक प्रसिद्ध पर्यटन स्थळांनाही जोडतो. यामध्ये चहाच्या मळ्यांसाठी आणि हिमालयीन दृश्यांसाठी प्रसिद्ध असलेले दार्जिलिंग, एक महत्त्वाचे प्राचीन बौद्ध शिक्षण केंद्र असलेले विक्रमशिला महाविहार, बिहार सर्किटवर जवळच असलेले महाबोधी मंदिर, भारतातील सर्वात पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक असलेला त्रिवेणी संगम, रामायणाशी जवळून संबंधित असलेले चित्रकूट धाम आणि भगवान शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर मंदिर यांचा समावेश आहे.

धार्मिक, सांस्कृतिक आणि वारसा स्थळांपर्यंतची जाण्याचा मार्ग प्रशस्त झाल्यामुळे पर्यटनाला चालना मिळेल. स्थानिक हस्तकला आणि आदरातिथ्य सेवांना प्रोत्साहन मिळेल आणि मार्गावरील लहान व्यवसायांना पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा आहे. रेल्वेचा मार्ग उत्तर बंगालच्या सीमाभागाला उत्तर महाराष्ट्र, मुंबई प्रदेशाशी जोडणारा एक महत्वाचा पूर्व-पश्चिम रेल्वे कॉरिडॉर आहे. या माध्यमातून पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र ही पाच राज्ये जोडली जातील. या राज्यांतील अनेक जिल्ह्यांसह महाराष्ट्रातील जळगाव, नाशिक, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यांना फायदा होईल, असा विश्वास रेल्वेने व्यक्त केला आहे.

एकंदरीत, अलिपूरद्वार-मुंबई (पनवेल) अमृत भारत एक्सप्रेस प्रादेशिक आर्थिक विकासासाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल. तसेच सीमावर्ती प्रदेश आणि प्रमुख शहरी केंद्रांमधील संपर्क व्यवस्था अधिक मजबूत करेल, असे रेल्वे मंत्रालयाने म्हटले आहे. देशात ३० अमृत भारत एक्स्प्रेस गाड्या कार्यरत असून त्यात नवीन सेवा जोडल्या गेल्यामुळे देशभरात सेवांचा विस्तार झाला आहे. कोणत्याही गतिमान किंमतीशिवाय,



वातानुरहित शयन (नॉन एसी स्लीपर) प्रवासाची किंमत प्रति हजार किलोमीटर ५०० रुपये आहे. जी सामान्य प्रवाशांसाठी सुलभता सुनिश्चित करते. अमृत भारत गाड्या पूर्णपणे नॉनएसी अर्थात वातानुरहित आहेत. ज्यामध्ये ११ सामान्य डबे, आठ शयनयान आणि एक पॅंट्री कार अर्थात खानपान सेवा आणि दोन द्वितीय श्रेणी व साहित्य डब्यांचा समावेश आहे.




# वासुदेव आला हो वासुदेव आला...

## लुप्त होत चाललेली एक जीवंत परंपरा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पहाटेची शांत वेळ अजून सूर्य उगवायच्या आधीच मातीच्या वाटेवरून एक ओळखीचा स्वर ऐकू यायचा
**‘वासुदेव आला हो सकाळच्या पारी, हरी नाम बोला’**

या फोटोमध्ये दिसणारा हा क्षण आज दुर्मिळ होत चालला आहे. डोक्यावर पारंपरिक शिरोभूषण, अंगावर पांढरा पोशाख, गळ्यात माळा, हातात झोळी आणि समोर वाकून नमस्कार करणारे एक लहानसे मूल. हा केवळ फोटो नाही; ही आपल्या संस्कृतीची आठवण आहे. जी हळूहळू विस्मरणात जात आहे.


पूर्वी वासुदेव म्हणजे दारोदारी फिरणारा साधा भिक्षुक नव्हता. तो गावाच्या सकाळीचा पहिला संदेशवाहक होता. त्याच्या मुखातून निघणारे ‘हरी नाम’ लोकांच्या मनाला शुद्ध करत असे. दिवसाची सुरूवात भक्तीने, नम्रतेने आणि समाधानाने व्हावी, यासाठी वासुदेवांचा आवाज पुरेसा होता.

आज मात्र परिस्थिती बदलली आहे. सकाळी हरिनाम ऐकण्याऐवजी मोबाईलची रिंगटोन कानात घुमते. वासुदेवांचा स्वर ट्रॅफिकच्या आवाजात हरवतो आहे. नव्या पिढीला ‘वासुदेव आला हो’ हे शब्द ऐकलेलेही नसतात. परंपरा नष्ट होते आहे हळूहळू, पण निश्चित.

या फोटोतील बालक वाकलेले आहे. कारण त्याला अजूनही संस्कारांची जाणीव आहे. पण प्रश्न असा आहे, की उद्या ही मुले मोठी झाल्यावर त्यांना वाकायला काही उरेल का? कारण ज्या समाजात परंपरांचा सन्मान राहत नाही, तेथे माणुसकीही कोमेजू लागते.

वासुदेवांची पावले आज कमी दिसत आहेत. पण त्यांनी दिलेला संदेश आज अधिक गरजेचा आहे.
नम्र राहा, साधे जगा, हरिनाम स्मरणात ठेवा.

**‘वासुदेव आला हो’** हा आवाज जर पूर्णपणे थांबला, तर आपल्या संस्कृतीचा एक श्वास थांबेल. म्हणून ही लुप्त होत चाललेली परंपरा केवळ आठवण म्हणून नव्हे, तर आचरणात जीवंत ठेवण्याची गरज आहे. कारण परंपरा जपली नाही, तर ओळखही हरवते.



# आदिशक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण ‘हळदी-कुंकू’

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

महाराष्ट्रात मकर संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत हळदी-कुंकू कार्यक्रम करण्यात येतो.

### हळदी-कुंकू समारंभ का करावा?

कुंकवाचे महत्त्व आणि उगम कधीपासून झाला. हळदी-कुंकवात महिला वाण का देतात.

**हळदी कुंकू स्पेशल :** नवीन वर्षातील पहिला सण मकर संक्रांती हा सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. महिला मकर संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत घरोघरी हळदी- कुंकवाच्या समारंभाचे आयोजन करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? मकर संक्रांतीत हळदी-कुंकवाचा सण का साजरा करतात? पौराणिक कथेनुसार सवाष्णमधील आदिशक्तीला शरण जाऊन तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण असतो. हळदी-कुंकू करणे म्हणजे एकप्रकारे ब्रह्मांडातील सुप्त आदिशक्तीच्या लहरींना जागृत होण्यासाठी त्यांना आवाहन करण, असे मानले जाते. यावेळी हळदी-कुंकवाचा सोहळा तुम्ही रथसप्तमीपर्यंत करू शकता.

### कुठून आली ही प्रथा?

कपाळी कुंकू लावण्याची प्रथा ही आर्येतर महिलांकडून आर्य महिलांनी आपल्याकडे घेतली आहे. जेव्हा आपण अतिप्राचीन मातृसंस्कृती पाहतो त्यात लाल रंगाला विशेष महत्त्व पाहिला मिळते. इ. स.च्या तिसऱ्या आणि चौथ्या शतकापासून वाङ्मयात कुंकवाचे उल्लेख आहे. रघुवंशात, अमरशतकात, भतृहरीच्या शृंगारशतकात कुंकमतिलकाला विशेष महत्त्व होते. ग्रामदेवतांना कुंकू फार प्रिय असल्याचे अनेक धार्मिक ग्रंथांत पाहावयास मिळते. दुर्गापूजेतही कुंकवाचे आधिक्य अधिक असून सप्तमातृकांनाही कुंकू प्रिय होते.



कुंकू अशाप्रकारे सौभाग्यप्रतीक मानले जाऊन लागले. भारतीय संस्कृतीत त्याचा अनेक शुभ कार्यात वापर करण्यात येत आहे. स्त्रियांचे कुंकू हे लेणे मानले गेले. देवादिकांच्या पूजेत कुंकू अनिवार्य झाले आणि लग्नपत्रिकेत कुंकू लावून मग ती नातेवाईक, आप्तेष्टांना हितचिंतकांना पाठवण्याची प्रथा इथूनच सुरु झाली. सुवासिनी घरातून बाहेर पडताना घरची गृहिणी तिला कुंकू लावते आणि म्हणते ‘तुझे सौभाग्य अक्षय्य राहो’. त्यानंतर चैत्रगौरीचे चैत्रतीज ते अक्षय्यतृतीयेपर्यंत होणारे चैत्र वा वासंतिक हळदी-कुंकू आणि संक्रांतीनिमित्त होणारे संक्रांत ते रथसप्तमी या काळात होणारे हळद-कुंकू आजही केले जाते. शिवाय गौरी, गणपती, नवरात्र या धार्मिक सणांतही काही कुटुंबात सौभाग्यवती स्त्रियांसाठी हळदी-कुंकू करावयाची प्रथा आजही पाळली जाते.

### कसे करायचे हळदी-कुंकू?

हळदी-कुंकू म्हणजे स्त्रीमधील आदिशक्तीची पूजा करणे. त्यामुळे जेव्हा तुम्ही तिला हळदी-कुंकू समारंभासाठी बोलवता तेव्हा तिला योग्य पद्धतीने तिची पूजा करा. सुवासिनी महिलेला हळदी-कुंकू लावला, त्यानंतर तिला अत्तर लावून तिच्यामधील मातेला प्रफुल्लीत करा. त्यानंतर तिची बोराने ओटी भरून सुवासिनी सौभाग्याचे प्रतीक असलेल्या वस्तू भेट म्हणजे वाण द्या. वाण देताना पदराचा टोक देऊन ते दिले पाहिजे. तिळगुळ देऊन नमस्कार करा. नववधूने पाच वर्षे हळदी-कुंकूच कार्यक्रम करावा.

### हळदी-कुंकू समारंभात वाण का देतात?

हळदी-कुंकू आणि वाण देणे आदी विधींतून आपल्यावर सगुण भक्तीचा संस्कार होण्यास, तसेच ईश्वराप्रती जीवाचा भाव वाढण्यास साहाय्य होते. वाण देण्याची एक पद्धत आहे. वाण देतांना नेहमी पदराच्या टोकाचा वाणाला आधार देऊन देतात. वाण देणे म्हणजे दुसऱ्या जिवातील देवत्वाला तन, मन आणि धन यांच्या त्यागातून शरण येणे होय. पदराच्या टोकाचा आधार देणे, म्हणजे अंगावरील वासनेच्या आसक्तीचाही त्याग करून देहबुद्धी त्यागण्यास शिकणे. वाणाच्या रूपाने दाही दिशांच्या माध्यमातून स्थळदर्शकरूपी सर्व प्रकारच्या आसक्तीचा त्याग करणे असे म्हटले जाते.

### वाण देताना

आपण सेवा मार्गातील वस्तू पण देऊ शकता जसे जप माळ, पिरॅमिड, नित्यसेवा याने स्वामी मार्गाचा प्रचार प्रसार होऊन नवीन सेवेकरी तुमच्या हातून घडू शकतो.
हा काळ साधनेला पोषक असल्याने या काळात दिलेल्या वाणातून देवता लवकर प्रसन्न होऊन जीवाला इच्छित फलप्राप्ती होते म्हणजेच दान सत्कारणी लागते. म्हणून तुम्ही पाहिले असेल की प्रत्येक सुवासिनी महिला संक्रातीमध्ये हळदी-कुंकू करताना अगदी छोटंसे का होईना पण वाण देतात. संक्रांतीला वाण देणे याचे आध्यात्मिक महत्त्व तर आहेच. शिवाय वाण देऊन आपण नात्यामधील गोडवा देखील जपतो..

### ‘हळदी-कुंकू’चे महत्त्व

मकर संक्रांत ते रथ सप्तमी हळदी-कुंकू समारंभ केले जातात. मकर संक्रांतीला ब्रह्मांडाची चंद्र-नाडी कार्यरत असते. सूर्याच्या उत्तरायणामध्ये ब्रह्मांडात रज-सत्त्व लहरी अधिक असतात. अशा पोषक काळामध्ये हळदी-कुंकू करणे हे लाभदायक असते. हळदी-कुंकवाच्या माध्यमातून आपण सुवासिनींच्या रूपात घरी आलेल्या साक्षात् आदिशक्तीचीच पूजा करत असतो.
हळद आणि कुंकू लावल्यामुळे सुवासिनींमधील श्री दुर्गा देवीचे अप्रकट तत्त्व जागृत होते अन् श्रद्धापूर्वक हळद-कुंकू लावणाऱ्या जीवासाठी कार्य करते. हळदी-कुंकू करणे म्हणजे एकप्रकारे ब्रह्मांडातील सुप्त आदिशक्तीच्या लहरींना जागृत होण्यासाठी त्यांना आवाहन करणे. हळदी-कुंकवाच्या माध्यमातून जीव एकप्रकारे दुसऱ्या जीवातील देवत्वाची पंचोपचारातून पूजाच करत असतो. हळदी-कुंकू आणि वाण देणे आदी विधीतून जीवावर सगुण भक्तीचा संस्कार होण्यास, तसेच ईश्वराप्रती जीवाचा भाव वाढण्यास सहाय्य होते.

# माघ महिन्यात पूजेदरम्यान दररोज करा ‘या’ दिव्य मंत्रांचा जप, नष्ट होईल सर्व पाप

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

ज्योतिषांच्या मते मकर संक्रांतीसह माघ महिन्यात सूर्यदेवाचे मकर राशीत संक्रमण दर्शविते. या शुभ प्रसंगी मोठ्या संख्येने भाविक गंगा नदीत पवित्र स्नान करतात. सनातन धर्मात माघ महिन्याचे विशेष महत्त्व आहे. हा महिना देवी गंगेला समर्पित आहे. या महिन्यात दररोज गंगेत स्नान केले जाते. त्यानंतर भगवान शिव आणि आई गंगेची भक्तीभावाने पूजा केली जाते. पूजादरम्यान भगवान शिव यांना गंगेच्या पाण्याने अभिषेक केला जातो.

माघ महिन्यात प्रयागराजमधील संगम नदीच्या काठावर दरवर्षी माघ मेळा भरतो. या शुभ प्रसंगी लाखो भाविक गंगेत स्नान करतात. धार्मिक श्रद्धा अशी आहे, की गंगेत स्नान केल्याने व्यक्ती जाणूनबुजून किंवा अजाणतेपणे केलेल्या पापांपासून मुक्त होते. जर आपणास गंगेची कृपा मिळवायची असेल, तर माघ महिन्यात स्नान आणि ध्यान केल्यानंतर दररोज गंगेच्या नावाची माळ जप करा.

### गंगा मातेची १०८ नावे

१) ॐ गंगायै नमः
२) ॐ विष्णुपादसंभूतायै नमः
३) ॐ हरवल्लभायै नमः
४) ॐ हिमाचलेन्द्रतनयायै नमः
५) ॐ गिरिमण्डलगामिन्यै नमः
६) ॐ तारकारातिजनन्यै नमः
७) ॐ ओंकाररूपिण्यै नमः
८) ॐ अनलायै नमः
९) ॐ क्रीडाकल्लोलकारिण्यै नमः
१०) ॐ स्वर्गसोपानशरण्यै नमः
११) ॐ सर्वदेवस्वरूपिण्यै नमः
१२) ॐ अंबःप्रदायै नमः
१३) ॐ सगरात्मजतारकायै नमः
१४) ॐ सरस्वतीसमयुक्तायै नमः
१५) ॐ सुघोषायै नमः
१६) ॐ सिन्धुगामिन्यै नमः
१७) ॐ भागीरत्यै नमः
१८) ॐ भाग्यवत्यै नमः
१९) ॐ भगीरतरथानुगायै नमः
२०) ॐ त्रिविक्रमपदोद्भूतायै नमः
२१) ॐ त्रिलोकपथगामिन्यै नमः
२२) ॐ क्षीरशुभ्रायै नमः
२३) ॐ नरकभीतिहृते नमः
२४) ॐ अव्ययायै नमः
२५) ॐ नयनानन्ददायिन्यै नमः
२६) ॐ नगपुत्रिकायै नमः
२७) ॐ निरञ्जनायै नमः
२८) ॐ नित्यशुद्धायै नमः
२९) ॐ उमासपयै नमः
३०) ॐ शुभ्राङ्गायै नमः
३१) ॐ श्रीमत्यै नमः
३२) ॐ धवलांबरायै नमः
३३) ॐ आखण्डलवनवासायै नमः
३४) ॐ कंठेन्दुकृतशेकरायै नमः
३५) ॐ अमृताकारसलिलायै नमः
३६) ॐ लीलालिंगितपर्वतायै नमः
३७) ॐ विरिञ्चिकलशावासायै नमः
३८) ॐ त्रिवेण्यै नमः
३९) ॐ पुरातनायै नमः
४०) ॐ पुण्यायै नमः
४१) ॐ पुण्यदायै नमः
४२) ॐ पुण्यवाहिन्यै नमः
४३) ॐ पुलोमजार्चितायै नमः
४४) ॐ भूदायै नमः
४५) ॐ पूतत्रिभुवनायै नमः
४६) ॐ जयायै नमः
४७) ॐ जंगमायै नमः
४८) ॐ जंगमाधारायै नमः
४९) ॐ जलरूपायै नमः
५०) ॐ जगद्धात्र्यै नमः
५१) ॐ जगद्भूतायै नमः
५२) ॐ जनार्चितायै नमः
५३) ॐ जह्नुपुत्र्यै नमः
५४) ॐ नीरजालिपरिष्कृतायै नमः
५५) ॐ सावित्र्यै नमः
५६) ॐ सलिलावासायै नमः
५७) ॐ सागरांबुसमेधिन्यै नमः
५८) ॐ रम्यायै नमः
५९) ॐ बिन्दुसरसे नमः
६०) ॐ अव्यक्तायै नमः
६१) ॐ अव्यक्तरूपधृते नमः
६२) ॐ जगन्मात्रे नमः
६३) ॐ त्रिगुणात्मकायै नमः
६४) ॐ संगत अघौघशमन्यै नमः
६५) ॐ भीतिहर्त्रे नमः
६६) ॐ शंखदुंदुभिनिस्वनायै नमः
६७) ॐ भाग्यदायिन्यै नमः
६८) ॐ नन्दिन्यै नमः
६९) ॐ शीघ्रगायै नमः
७०) ॐ शरण्यै नमः
७१) ॐ शशिशेकरायै नमः
७२) ॐ शाङ्कर्यै नमः
७३) ॐ शफरीपूर्णायै नमः
७४) ॐ भर्गमूर्धकृतालयायै नमः
७५) ॐ भवप्रियायै नमः ।
७६) ॐ सत्यसन्धप्रियायै नमः
७७) ॐ हंसस्वरूपिण्यै नमः
७८) ॐ भगीरतभृतायै नमः
७९) ॐ अनन्तायै नमः
८०) ॐ शरच्चन्द्रनिभाननायै नमः
८१) ॐ दुःखहन्त्र्यैनमः
८२) ॐ शान्तिसन्तानकारिण्यै नमः
८३) ॐ दारिद्र्यहन्त्र्यै नमः
८४) ॐ शिवदायै नमः
८५) ॐ संसारविषनाशिन्यै नमः
८६) ॐ प्रयागनिलयायै नमः
८७) ॐ श्रीदायै नमः
८८) ॐ तापत्रयविमोचिन्यै नमः
८९) ॐ शरणागतदीनार्तपरित्राणायै नमः
९०) ॐ सुमुक्तिदायै नमः
९१) ॐ पापहन्त्र्यै नमः
९२) ॐ पावनाङ्गायै नमः
९३) ॐ परब्रह्मस्वरूपिण्यै नमः
९४) ॐ पूर्णायै नमः
९५) ॐ जंभूद्वीपविहारिण्यै नमः
९६) ॐ भवपयै नमः
९७) ॐ भीष्ममात्रे नमः
९८) ॐ सिक्तायै नमः
९९) ॐ रम्यरूपधृते नमः
१००) ॐ उमासहोदर्यै नमः
१०१) ॐ बहुक्षीरायै नमः
१०२) ॐ क्षीरवृक्षसमाकुलायै नमः
१०३) ॐ त्रिलोचनजटावासायै नमः
१०४) ॐ ऋणत्रयविमोचिन्यै नमः
१०५) ॐ त्रिपुरारिशिरःचूडायै नमः
१०६) ॐ जाह्नव्यै नमः
१०७) ॐ अज्ञानतिमिरापहृते नमः
१०८) ॐ शुभायै नमः

# चिरंजीव ऋषींच्या जीवनातून मिळणारी अमर प्रेरणा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय आध्यात्मिक परंपरेत भगवान मार्कंडेय यांचे स्थान अत्यंत अनन्यसाधारण आहे. चिरंजीव म्हणून ओळखले जाणारे महर्षी मार्कंडेय हे केवळ दीर्घायुष्याचे प्रतीक नसून अढळ भक्ती, तपश्चर्या, धर्मनिष्ठा आणि ईश्वरावर असलेल्या अखंड श्रद्धेचे जीवंत उदाहरण आहेत. भगवान मार्कंडेय जयंती हा दिवस त्यांच्या महान कार्यांचे स्मरण करून देणारा आणि मानवजातीसाठी नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा पुनःउच्चार करणारा पवित्र उत्सव आहे.

पुराणकथेनुसार महर्षी मृकंडू आणि त्यांची पत्नी मरुद्वती हे शिवभक्त होते. अपत्यप्राप्तीसाठी त्यांनी दीर्घकाळ कठोर तपश्चर्या केली. भगवान शिव यांनी त्यांना वरदान दिले. अल्पायुषी पण तेजस्वी पुत्र किंवा दीर्घायुषी पण अज्ञानी पुत्र यापैकी एकाची निवड करण्यास सांगितले. मृकंडू ऋषींनी तेजस्वी पुत्राची निवड केली. त्यामुळे भगवान मार्कंडेयांचा जन्म झाला. जन्मापासूनच ते शिवभक्ती, वेदाध्ययन आणि साधनेत रमले होते.

जेव्हा मार्कंडेयांचे आयुष्य केवळ सोळा वर्षांचे राहिले होते तेव्हा मृत्यूची वेळ जवळ आली. त्या क्षणी त्यांनी शिवलिंगाला आलिंगन देत भगवान शिव यांचे अखंड नामस्मरण सुरू ठेवले. यमराज जेव्हा त्यांना घेऊन जाण्यास आले तेव्हा शिवलिंगाभोवती यमपाश टाकण्यात आला. यामुळे भगवान शिव क्रोधित झाले आणि त्यांनी यमराजाला पराभूत करून मार्कंडेयांना चिरंजीवत्वाचे वरदान दिले. या प्रसंगातून भक्तीची शक्ती आणि ईश्वरकृपेचे सामर्थ्य अधोरेखित होते.

भगवान मार्कंडेय हे केवळ चमत्कारिक कथांचे नायक नसून महान ऋषी, विद्वान आणि पुराणकर्ते होते. ‘मार्कंडेय पुराण’ हा त्यांच्या नावाने ओळखला जाणारा महत्त्वाचा ग्रंथ असून त्यामध्ये धार्मिक, सामाजिक आणि आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा सखोल विचार आढळतो. विशेषतः देवी महात्म्याचा समावेश असलेले हे पुराण शक्ती उपासनेचा मूलाधार मानले जाते. नवरात्रोत्सवात पठण केले जाणारे देवी महात्म्य हे भक्तांसाठी विशेष श्रद्धेचे केंद्र आहे.

महर्षी मार्कंडेयांनी आपल्या उपदेशांद्वारे सत्य, अहिंसा, संयम, करुणा आणि धर्मपालन यांचे महत्त्व समाजाला पटवून दिले. त्यांनी मानवजीवनाला केवळ भौतिक सुखापुरते मर्यादित न ठेवता आध्यात्मिक उन्नतीकडे नेण्याचा मार्ग दाखविला. त्यांच्या विचारांमध्ये सामाजिक समरसता, नैतिक मूल्ये आणि ईश्वरभक्ती यांचा सुंदर समन्वय दिसून येतो.

**भगवान मार्कंडेय जयंती विशेष**



आजच्या धावपळीच्या, तणावग्रस्त आणि भौतिकवादी युगात भगवान मार्कंडेयांचा आदर्श अधिकच सुसंगत वाटतो. जीवनात येणाऱ्या संकटांपुढे न डगमगता श्रद्धा, संयम आणि आत्मविश्वास ठेवणे किती आवश्यक आहे, हे त्यांच्या जीवनातून स्पष्ट होते. मृत्यूच्या भीतीवर मात करून ईश्वरावर संपूर्ण समर्पण केल्यास जीवनात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, हा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.
भगवान मार्कंडेय जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, अभिषेक, कीर्तन, प्रवचने आणि पुराणवाचनाचे आयोजन केले जाते. या निमित्ताने नव्या पिढीला भारतीय संस्कृती, ऋषीपरंपरा आणि आध्यात्मिक वारसा यांची ओळख करून देण्याची संधी मिळते. भगवान मार्कंडेय जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नसून जीवनमूल्यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. त्यांच्या विचारांचा आणि आदर्शांचा अवलंब करून सदाचार, भक्ती आणि मानवतेचा मार्ग स्वीकारणे, हीच या जयंतीची खरी सार्थकता आहे. अशा महान ऋषींचे जीवन आणि कार्य समाजाला सदैव प्रेरणा देत राहील, यात शंका नाही.

# माघ महिन्याचे आध्यात्मिक व धार्मिक महत्त्व

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू पंचांगानुसार माघ महिना हा अत्यंत पवित्र व पुण्यप्रद मानला जातो. पौष महिन्यानंतर आणि फाल्गुन महिन्यापूर्वी येणारा हा महिना साधना, तपश्चर्या, स्नान, दान आणि भक्ती यासाठी विशेष महत्त्वाचा आहे. माघ शुद्ध प्रतिपदेपासून माघ अमावास्येपर्यंतचा कालखंड धार्मिकदृष्ट्या अतिशय फलदायी समजला जातो.

### १) माघ स्नानाचे महत्त्व

माघ महिन्यातील स्नानाला विशेष पुण्य लाभते, असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी, कृष्णा अशा पवित्र नद्यांमध्ये किंवा सूर्योदयापूर्वी केलेले स्नान पापक्षालन करणारे व मोक्षदायी मानले जाते.
**माघस्नानं नरो यस्तु कुरुते नियमेन वै । सर्वपापविनिर्मुक्तः विष्णुलोकं स गच्छति ॥**
असे धर्मग्रंथात वर्णन आहे.

### २) दानधर्माचे महत्त्व

माघ महिन्यात केलेले दान अनेक पटींनी फलदायी ठरते. विशेषतः अन्नदान, वस्त्रदान, तीळदान, सुवर्णदान, गोदान. हे दान अत्यंत पुण्यकारक मानले जाते. गरजू, साधू-संत, ब्राह्मण यांना दिलेले दान अक्षय पुण्य देते असे मानले जाते.

### ३) माघ एकादशी व व्रते

माघ महिन्यातील भीष्म एकादशी अत्यंत महत्त्वाची आहे. या दिवशी भगवान विष्णूंची उपासना केल्यास सर्व व्रतांचे फळ मिळते असे मानले जाते. तसेच माघ महिन्यातील सोमवार, गुरुवार व शनिवारी उपवास, जप, नामस्मरण यांना विशेष महत्त्व आहे.

### ४) कल्पवास व प्रयाग महात्म्य

माघ महिन्यात प्रयागक्षेत्री (त्रिवेणी संगम) कल्पवास करण्याची परंपरा आहे. कल्पवास म्हणजे संपूर्ण माघ महिना संयम, साधना, उपवास, जप, ध्यान आणि धार्मिक आचरणात घालवणे. असे केल्याने आत्मशुद्धी व आध्यात्मिक उन्नती साध्य होते.

### ५) सूर्योपासना व आरोग्य दृष्टिकोन

माघ महिन्यात सूर्य मकर राशीत असतो. त्यामुळे सूर्योदयाच्या वेळी केलेले स्नान व सूर्यनमस्कार आरोग्यदायी ठरतात. थंड वातावरणात संयमित आहार-विहार शरीर, मन व बुद्धी शुद्ध ठेवण्यास मदत करतो.

### ६) संत परंपरा व भक्तीमार्ग

संत परंपरेत माघ महिन्याला विशेष महत्त्व आहे. नामस्मरण, हरिपाठ, भजन, कीर्तन, पारायण यासाठी हा काल श्रेष्ठ मानला जातो. या महिन्यात भक्तीभावाने केलेली साधना मनातील विकार दूर करून ईश्वराशी जवळीक निर्माण करते.

### ७) आध्यात्मिक अर्थ

माघ महिना म्हणजे अंतर्मुख होण्याचा काळ. बाह्य थंडीप्रमाणेच अंतर्मनातील विकार शमवून शुद्धीकरण करण्याचा हा काळ आहे. संयम, तप, दया, सेवा आणि भक्ती या गुणांचा विकास करण्याची संधी माघ महिना देतो.

माघ महिना हा केवळ धार्मिक विधींचा काळ नसून आत्मिक उन्नतीचा सुवर्णकाल आहे. स्नान, दान, जप, तप व सेवा यांच्या माध्यमातून मनुष्य आपल्या जीवनात शांती, पवित्रता आणि आध्यात्मिक प्रगती साधू शकतो. म्हणूनच शास्त्रांमध्ये माघ महिन्याला ‘पुण्यांचा राजा’ असे गौरविले आहे.

## माघ महात्म्य

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

माघ महिना आता सुरू झालेला आहे. मघा या नक्षत्रामध्ये जेव्हा पौर्णिमेचा चंद्र असतो त्या महिन्याला ‘माघ’ असे म्हणतात. माघ महिना हा थंडीचा महिना म्हणून सुद्धा ओळखला जातो. या महिन्याचे वैदिक नाव ते म्हणजे तपस् होय तसेच पौष पौर्णिमेपासून माघ पौर्णिमेपर्यंत माघ स्नान करण्याची पद्धत आहे. याच महिन्यात देवीचे माघी गुप्त नवरात्र वा शामला नवरात्र असते. माघी पौर्णिमेस शनी मेषेत, गुरू व चंद्र सिंहेत आणि सूर्य श्रवण नक्षत्रात असल्यास तो महामाघी योग होतो. या दिवशी ‘श्री’ या बीजमंत्राचा जप करावा. पश्चिम बंगालमध्ये युगादी माघी पौर्णिमा ही नववर्षाची तिथी मानली जाते.

१) माघ शुद्ध चतुर्थी- श्री गणेश जयंती वा तिलकुंद चतुर्थी. उमा चतुर्थी नावानेही साजरी होते.
२) वसंत पंचमी वा श्रीपंचमी (सरस्वती व लक्ष्मीपूजा)
३) माघ शुद्ध सप्तमी म्हणजे रथसप्तमी
४) भीष्माष्टमी- माघ शुद्ध अष्टमी
५) माघ शुद्ध नवमी- दासबोध ग्रंथ जयंती, श्री मध्वाचार्य ब्रदीगमन तिथी
६) माघ शुद्ध दशमी
७) माघी वारी (पंढरपूर)-दशमी, एकादशी, द्वादशी (भीष्म द्वादशी)
८) माघी पौर्णिमा म्हणजे माघ स्नान समाप्ती
९) माघ वद्य प्रतिपदा म्हणजे गुरू प्रतिपदा
१०) माघ वद्य सप्तमी-श्री गजानन महाराज प्रकट दिन
११) माघ वद्य नवमी म्हणजे-दासनवमी
१२) माघ वद्य एकादशी. महादेव काठीची एकादशी
१३) माघ वद्य चर्तुदशी म्हणजे- महाशिवरात्री